महाराष्ट्र शासन

क्रमांक:- एनजीसी २००६/ ( ३९८/०६) मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक: ३ जुलै, २००६.

प्रति,
कुलसचिव,
एस एन डी टी विद्यापीठ
मुंबई

विषय:-शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालयांना मान्यता मिळणेबाबत..

महोदय,

आपल्या विद्यापीठामार्फत सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार नविन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव विचारात घेऊन खालील संस्थेस सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून नविन महाविद्यालय सुरु करण्यास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | ठिकाण | अभ्यासक्रम/विद्याशाखा |
|---|---|---|
| महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे | पुणे | बी सी ए (विज्ञान शाखे अंतर्गत) |

सदर मान्यता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ८२(५) नुसार पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

- सदर संस्थेने कायम विना अनुदान तत्वावर महाविद्यालय चालविण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र सादर केले नसल्यास सदर हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे. संस्था हमीपत्र देण्यास तयार नसल्यास तसे शासनास कळवावे व शासनाचे आदेश विद्यापीठाने प्राप्त करुन घ्यावेत.
- सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.
- या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बाबीसंबंधीची सर्वस्वी जबाबदारी स्विकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
- संस्थेने महाविद्यालयासाठी शैक्षणिक संस्था विनियमन प्राधिकरणाकडून शुल्क प्रमाणित करुन घ्यावे.
- या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलत लागू होणार नाही.

२. सदर महाविद्यालयाने वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यास त्या अधिन महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याबाबत विद्यापीठाने कार्यवाही करावी व आपला अहवाल संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य , पुणे तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा.

आपला विश्वास,

(बि. वा. सुतार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
- विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.
- संबंधित संस्था
- मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा. उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय , मुंबई-३२
- मा. मंत्री (उ व तं. शि.) यांचे खाजगी सचिव
- मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव

निवडनस्ती / मशि-३

K. B. Joshi Institute of IT BCA College
Karvenagar, Pune - 52.